# Yashoda Girls' Arts & Commerce College, Nagpur

## Department of Sociology

## Assignment

## Session: 2017 – 2018

Name :- Sirthiya M. Nandgave

Class :- B.A. I

Subject :- Sociology.

Topic :- Socialization.

मार्गदर्शक : डॉ. प्रकाश सोनक सर.

2017 – 2018

Principal
Yashoda Girls Arts & Commerce
College, Sneh Nagar, Nagpur-15

डॉ. प्रकाश सोनक

SEAL

## युनिट क्र. ३ सामाजीकरण [Socialization]

<u>सामाजीकरणाचा अर्थ</u> :→ मानव हा एक सामाजिक प्राणी आहे असे म्हटले जाते परंतु मानव हा जन्मतः समाजशील प्राणी आहे का ? हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. मानवामधील समाजशिलता हा गुण जैवीक नाही इतर प्राण्या प्रमाणेच मानव हा जन्मतः समाजशील नसतो. तर तो समाजात रहत असल्यामुळे समाजशील बनतो जन्माला येणारे प्रत्येक मूल (अर्भक) हे इतर प्राण्याप्रमाणे जैविक प्राणी आहे. तो फक्त रक्त, पेशी, हाड मास असलेला एक जीव असतो. त्या मुलाला कोणत्याही प्रकारची सामाजिक जाणीव नसते. त्याला बोलता येत नाही ते मूल पूर्णपणे आईवर अवलंबून असते. जन्माला येणाऱ्या प्रत्येक मुलाची अवस्था ही इतर जैविक प्राण्यासारखी असते.

★ इतर प्राण्यांना बऱ्याच गोष्टी सहजप्रवृत्तीमुळे कळतात.

उदा :- पक्षी घरटे बांधतात, उंदीर जमीन पोखरून आपल्यासाठी बीळ तयार करतात. या गोष्टी पक्षी किंवा उंदराची सहजप्रवृत्ती आहे. परंतु मानवामध्ये मात्र अशा सहजप्रवृत्तीचा अभाव असतो. मूल जन्मतःच स्वावलंबी नसते. हात - पाय हालविणे, भूक लागली की रडणे, जागेवरच मलमूत्राचे विसर्जण करणे, इत्यादी काही ठरावीक गोष्टीशिवाय कोणत्याही गोष्टीची जाणीव लहान मुलाला नसते. इतर प्राण्यांच्या

तुलनेत मानवी मूलास मिळालेला आनुवंशिक वारसा वैशिष्टपूर्ण असतो. बालकाची उभे राहण्याची क्षमता, दीर्घदृष्टी, श्रवणशक्ती, ग्रहणक्षमता, भाषाक्षमता, अमर्याद स्वरूपाचा विकासक्षम मेंदू, हातापायाची ठेवण आणि त्यातील लवचिकता इत्यादी वैशिष्टयपूर्ण गोष्टींमुळे मूल सामाजिक व्यवहार शिकू शकते. वरील गोष्टीचा प्राण्यांमध्ये अभाव असल्यामुळे - त्यांच्यात शिक्षणक्षमतेचा अभाव असतो. परंतु इतर प्राण्यांप्रमाणेच जैविक प्राणी असलेले मूल मात्र आपल्या शिक्षण क्षमतेमुळे हळूहळू बऱ्याच गोष्टी शिकत असते. या शिकण्याच्या क्षमतेमुळे जैविक असलेल्या मुलाचे रूपांतर सामाजिक प्राण्यांमध्ये होते. त्यामुळेच मानव हा एक समाजशील प्राणी बनले आहे.

★ सुप्रसिद्ध तत्वज्ञ जॉन लॉकच्या मते, ' जन्मत: लहान मुलाचे मन हे कोऱ्या पाटीसारखे असते. त्या मुलाच्या मनावर विविध घटकाद्वारे संस्कार घडत जातात आणि हळूहळू विकासाला सुरुवात होऊन समाजात जीवन जगण्यासाठी तो लायक बनतो.' समाजातील व्यक्तीचे जे विविध आचार-विचार असतात - ते लहान मूल आत्मसात करते आणि त्यानुसार वागते. मुलाच्या जन्मापासून सुरु झालेली शिकण्याची प्रक्रिया ही त्याच्या जीवनात मृत्यूपर्यंत निरंतर सुरु असते. या शिकण्याच्या प्रक्रियेतून

लहान मुलाला समाजातील भाषा, विश्वास, परंपरा, कायदे, मूल्ये व प्रमाणके संकेत इत्यादी विविध गोष्टीचे ज्ञान होते.

* सामाजीकरण ही एक प्रक्रीया असून समाजात एकमेकांच्या सहवासात राहात असतांना कोणते वर्तन करावे अगर करू नये, काय योग्य आणि काय अयोग्य आहे. याची जाणीव व्यक्तीला सामाजीकरणामधून होत असते.

सामाजीकरणाची व्याख्या :->

1) डेव्हिड पॉपेनो :-> " सामाजीकरण एक अशी प्रक्रिया आहे की, ज्यात व्यक्ती - सामाजिक प्राण्यात विकसित होतो आणि त्याला समाजात यथायिपणे जीवन घालविण्याची क्षमता प्राप्त होते."

2) ऑगबर्न :-> " ज्या प्रक्रियेत व्यक्ती सामाजिक नियमांचे अनुसरण करणे शिकते त्या प्रक्रियेस सामाजीकरण असे म्हणतात."

3) हॅरी जॉन्सन :-> " सामाजीकरण हे एक असे प्रकारचे शिक्षण आहे की ते शिक्षण घेणाऱ्या व्यक्तीस सामाजिक भूमिका वाजविता येतात."

४) हॉर्टन आणि हंट :→ " सामाजिकरण ही एक अशी प्रक्रिया आहे, जिच्यामुळे व्यक्तीला तिच्या समूहाची नियमाने आत्मसात करता येतात. परिणामी व्यक्तीचा "स्व" चा विकास होतो."

५) ए. डब्लू ग्रीन :→ " सामाजीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की, ज्याद्वारा मूल सांस्कृतिक घटकतत्वे, स्वत्व, व्यक्तिमत्व प्राप्त करते"

६) एच. टी. मुजुमदार :→ " सामाजिकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की जिच्यामुळे मूक प्रकृती ही मानव प्रकृतीमध्ये आणि एक व्यक्ती ही माणसामध्ये परिवर्तीत होते."

* सामाजिकरण ही प्रत्येक मुलाच्या जन्मापासून सुरु होऊन त्याच्या मृत्यूपर्यंत सुरु असणारी अशी प्रक्रिया आहे. म्हणून सर्वच समाजशास्त्रांसाठी आपल्या व्याख्येत समाजिकरणाचा एक प्रक्रिया म्हणुन उल्लेख केला आहे. विशेष म्हणजे ही प्रक्रिया शिकावी लागते. सामाजिक रुढी, प्रथा, प्रमाणके व मूल्ये, संकेत याद्वारे ही प्रक्रिया आत्मसात केली जाते. त्याचप्रमाणे स्पर्धा, विरोध, द्वेष, संघर्ष इत्यादी गोष्टी सुद्धा मूल सामाजीकरणाच्या प्रक्रियेतून आत्मसात केली जाते त्याचप्रमाणे स्पर्धा, विरोध, द्वेष,

संघर्ष इत्यादी गोष्टी सुद्धा मुल सामाजिकरणाच्या प्रक्रियेतून आत्मसात करीत असते. व्यक्तीच्या विकास करणारी ही प्रक्रिया आहे.

* सामाजिकरणाच्या संदर्भात गिलीन आणि गिलीन म्हणतात की, " सामाजीकरण ही एक अशी प्रक्रिया आहे की, जिच्याद्वारे व्यक्ती समुहाचा एक क्रियाशील सदस्य बनते. समूहाच्या म्हणण्याप्रमाणे वागते आणि समुहाच्या चालीरीती, परंपरा व सामाजिक परिस्थिती ह्याच्याशी समन्वय स्थापन करते." यावरुन लक्षात येते की, सामाजीकरणाच्या प्रक्रियेमुळे समाजातील व्यक्ती कार्य प्रवृत्त होतात आणि समाजातील प्रचलीत नियमाप्रमाणे त्या वागतात. या बरोबरच समाजातील प्रथा, परंपरा आणि आचार - विचार आत्मसात करतात.

* रॉस च्या मते, " सामाजीकरण म्हणजे समाजामध्ये आपुल्कीच्या भावनेचा उदय व इतरांशी सहकार्य करण्याची पात्रता यांचा विकास होय." समाजातील व्यक्तींमध्ये एकमेकांशी सहकार्य करण्याची पात्रता निर्माण करणे, सामाजिक जीवनात आवश्यक असलेले आत्मसंयम व्यक्तीने शिकणे आणि सामाजिक जबाबदारीचा आणि समतोल अशा व्यक्तिमत्वाचा अनुभव घेणे म्हणजे सामाजीकरण होय.

## सामाजीकरणाचे सिद्दांत.

[Theories of Socialization]

1) मीड चा सिद्धांत [Mead's Theory] :→ व्यक्तीचे सामाजीकरण हे समाजद्वारा होते. या दुर्खिम आणि कूले यांच्या विचारांशी अमेरिकन समाजशास्त्रा मीड सहमत होते. परंतु मीडने कूलेच्या सिद्दांतावर टीका केली.

* सामाजीकरणाची प्रक्रिया स्पष्ट करण्यासाठी मीडने ' स्वचेतन ' [Self consciousness] या संकल्पनेच आधार घेतला. मीड चा सिद्दांत हा प्रमुख्याने मानवशास्त्रीच आहे. एखादी व्यक्ती जेव्हा "स्व" च्या बाबत जागृत होते तेव्हा, ती व्यक्ती दुसऱ्याचे विचार, भावना, आदर्श ह्या संबंधी सुद्दा जागृत होते. म्हणजे मीड ने सामाजीकरणात 'स्व' च्या विकासाविषयी जागृतता आणि दुसऱ्याच्या दृष्टीने मूल्यांकन ह्या दोन्ही गोष्टींना महत्व दिले आहे. त्याच्या सिद्दांत हा 'मी' (I) आणि 'मला' (me) या दोन गोष्टीवर आधारित आहे. 'मी' चा प्रत्येक व्यक्ती अनुभव करतो आणि याचा विकास हा समाजातच होतो. परंतु 'मी' चा अनुभव 'मला' च्या अनुभवापेक्षा वेगळा असतो. 'मला' हा शब्द सामुहिक अनुभवाचे प्रतिनिधित्व करतो आणि हा अनुभव समान हिताच्या भावनेवर आधारित असतो. सामाजीकरणाचे मोजमाप हे व्यक्तीमधील या समान हितांच्या विकास होय. 'मला' चा अनुभव हा

समाजात आणि समाजद्वारा होतो. 'स्व' च्या आधारावर व्यक्तिमत्व निर्माण होते आणि मेंदू क्रियाशील होतो. दुसऱ्या सोबतच्या पारस्पारिक संबंधातूनच मुलाच्या 'स्व' चा विकास होतो.

* 'मी' आणि 'मला' हे एकच वस्तूचे दोन पैलू होत. दोन्ही पैलू मिळून मानवाचे व्यक्तिमत्व तयार होते. आणि हे सामाजिक अनुभवातून प्रगट होत असते. मीड ने आपला सिद्धांत 'सामान्यीकृत अन्य' या संकल्पनेद्वारा स्पष्ट केला आहे. 'सामान्यीकृत अन्य' म्हणजे दुसऱ्याकडून केलेल्या मुल्यांकनामुळे स्वतःच्या बाबत बनलेली धारणा होय. व्यक्ति जेव्हा एखादे कार्य करते त्यावेळी व्यक्ति आपली तुलना ह्या 'सामान्यीकृत अन्य' इतरांशी' करीत असते. त्यामुळे सामाजीकरण होते अशा रीतीने 'स्व' ला समजून घेण्यासाठी दुसऱ्याची किंवा समाजाची भूमिका ग्रहन करणे आवश्यक असते ही दुसऱ्याची भूमिका जाणून घेतली नाही तर त्या व्यक्तिच्या 'स्व' च्या विकासात अडथळा निर्माण होतो. म्हणून सामाजीकरणाच्या प्रक्रियेत इतराची भूमिका [ विचार, मत, प्रतिक्रिया ] जाणून घेणे अथवा इतरांची भूमिका लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यातूनच 'स्व' चे सामाजीकरण होत असते.

## सामाजिकरणाच्या जैविक पूर्वावश्यकता

## [Biological Pre-requisites of Socialization]

1) **पराबलंबित्व (Dependence) :->** मानव हा परावलंबी आहे. इतर प्राण्यांच्या तुलनेत मानव हा विविध गरजांच्या पूर्तीकरीता बराच काळ दुसऱ्यावर अवलंबून असतो. जन्माला आलेल्या मुलाला कोणत्या गोष्टीची जाणिव नसते. खाणे - पिणे, मलमूत्र विसर्जन, थंडी, वाऱ्यापासून संरक्षण इत्यादी सर्वच गोष्टींकरीता लहान मूल आईवर अवलंबून असते. मुलाला आपल्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी दीर्घकाळ पर्यंत आई - वडील, भाऊ - बहीण नातेवाईक यांच्यावर अवलंबून राहावे लागते. त्यामुळे भाषा, वर्तनप्रकार, कौशल्ये इत्यादी गोष्टी आत्मसात करण्याची त्याला संधी प्राप्त होते. आणि मूल जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या क्षमता ग्रहण करते.

2) **सहजप्रवृत्तीचा अभाव [Absence of Instincts] :->** मानवामध्ये सहजप्रवृत्तीचा अभाव आढळतो. मानवी वर्तन हे सहजप्रवृत्तीमुळे निर्धारित होत नाही परंतु प्राणीमात्रांमध्ये मात्र सहज प्रवृत्ती आढळून येते. सहजप्रवृत्ती म्हणजे जैविक आधाराने निश्चित झालेले प्राण्यांचे वर्तन प्रतिमान होय. असा सहजप्रवृत्तीचा अर्थ केला जातो. कोकीळेचा गोड आवाज जन्मजात प्रवृत्तीने ~~निश्चित~~ निश्चित झालेल्या आहेत. या गोष्टी पशू - पक्षांना शिकाव्या लागत नाही.

* मानवामध्ये मात्र अशी आंतरिक आणि जन्मजात प्रवृत्ती आढळत नाही. परंतु मानवी वर्तनास चालना देणाऱ्या काही प्रेरणा असतात.

उदा. भूक, कामवासना इत्यादी या प्रेरणा जरी मानवी वर्तनास चालना देत असल्या तरी मानवाचे वर्तन हे समाजाद्वारे निर्धारित केले जाते. व्यक्ती हे वर्तन सामाजीकरणाच्या प्रक्रियेतून शिकत असते.

3) अर्भकाची स्वीकारशीलता [Plasticity of Infant] :→ स्वीकारशीलता म्हणजेच ग्रहणक्षमता होय. सामाजीकरणाच्या प्रक्रियेमध्ये स्वीकारशिलतेस विशेष महत्व आहे. मानवाप्रमाणेच इतर प्राण्यांमध्ये ग्रहणक्षमता असते. परंतु प्राण्याची ग्रहणक्षमता मर्यादित आहे. तर मानवामधील ग्रहणक्षमता मात्र अमर्यादित आहे. त्यामुळे लहान मुल आपल्या समाजातील भाषा, आचार - विचार, कौशल्ये इत्यादी अनेक गोष्टी शिकत असते. प्रत्येक समाजातील मूल्ये आणि प्रमाणकानुसार स्वीकारशीलता वेगवेगळी असते. मुलाची स्वीकारशीलता अमर्यादित स्वरूपाची असल्यामुळे सामाजीकरण शक्य झाले आहे.

4) भाषा क्षमता [Language] :→ प्राण्यांमध्ये भाषेचा अभाव आहे. परंतु मानवाला भाषा शिकण्याचे सामर्थ्य असते. त्यामुळे ज्ञानसंचय करून ठेवणे शक्य झाले. हे ज्ञान एका ~~पिढीकडून~~ पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरीत होत असते. भाषा क्षमतेमुळे मुल कोणतीही गोष्ट शिकू

शकते पण जन्मतः भाषा ही मुलाला येत नाही. लहान मुल जंगलात राहीले तर ते भाषा शिकू शकत नाही. बंगालमध्ये जे. सिंग या ख्रिश्चन मिशनऱ्यास लांडग्याच्या कळपात दोन मुली आढळल्या होत्या त्या दोन्ही मुली लांडग्याच्या कळपात राहील्यामुळे त्यांना भाषा येत नव्हती समाजात राहुनच व्यक्तीला भाषा शिकता येते.

भाषेमुळे विचारांचे आदान - प्रदान करणे शक्य झाले आहे. विशेष म्हणजे मानवी समाजाच्या निर्मितीत भाषेला प्रमुख स्थान आहे. कारण भाषेच्या द्वारे ज्ञान, विचार, भावना यांचा प्रसार होतो. भाषेमुळे आंतरक्रिया करणे सुलभ झाले आहे. त्यामुळे आंतरक्रियेचे विश्व अधिक विस्तृत होऊन सामाजीकरण हे अधिक सोपे झाले आहे. हेच सामाजीकरणातील प्रमुख घटक आहेत. कारण या क्षमता अथवा जैविक पूर्वावश्यकतेमुळेच सामाजीकरणाची प्रक्रिया शक्य झाली आहे.

## सामाजीकरणाच्या अवस्था किंवा पायऱ्या
## [Stages of Socialization]

1) **मौखिकावस्था [The Oral Stage]** :→ सामाजीकरणाच्या प्रक्रियेतील मौखिकावस्था ही पहिली अवस्था होय. या अवस्थेमध्ये मुलाच्या जन्मापासून तर वयाच्या दीड वर्षापर्यंतच्या कालावधीचा समावेश होतो. मुलाच्या जन्माबरोबरच मौखिकावस्थेची सुरुवात होते. या काळात मूल पूर्णपणे आपल्या आईवर अवलंबुन असते. मुलाचा संबंध हा आईशी येत असतो.

मौखिकावस्थेत मुलांच्या गरजा मर्यादित असतात. मुलाला भुकेची आणि संरक्षणाची गरज असते. भूक आणि थंडी लागली की मूल रडु लागते. मुलाच्या आवश्यक गरजा पूर्ण करण्याची जबाबदारी आईची असते. मुलाच्या शारीरिक आणि मानसिक विकास करणे हे आईचे प्रमुख कार्य असते. या अवस्थेत आई ही मुलाच्या दृष्टीने आपल्या गरजा भागविणारी आणि सुख देणारी एकमात्र व्यक्ती असते. मूल थोडे मोठे झाल्यावर आईशी परिचित होते. हळूहळू कुटुंबातील इतर सदस्यांना मूल ओळखु लागते. आईचा स्पर्श आणि कुटुंबातील इतर सदस्यांचा स्पर्श यामधील फरक त्याला जाणवतो आपण सतत आईजवळ असावे अशी भावना मुलामध्ये निर्माण होते. इतर व्यक्तीने घेतल्यास ते रडू लागते आणि आपणास आईने घ्यावे अशी भावना रडण्यातून व्यक्त करते.

फरक मुलाला कळू लागतो. कारण मुलाने योग्य वर्तन केल्यास त्याचे कौतुक केले जाते. जर तो आई किंवा मोठ्या मंडळींच्या मतानुसार वागला नाही, तर त्याला रागावले जाते. या अवस्थेत आईची दुहेरी भूमिका असते. आई आणि शिक्षक अशी दुहेरी भूमिका मुलाला वळण लावण्यासाठी पार पाडावी लागते.

3) ईडिपलावस्था [The oedipal stage] :→ ईडिपल ही अवस्था मुलाच्या वयाच्या ६ वर्षापासून ते १२ वर्षापर्यंत सुरु असते. सिगमंड फ्राईड यांनी ईडिपलावस्थेचे ईडिपस गंडाचा काळ आणि लॅटेन्सी असे दोन भाग केले आहेत.

[अ] ईडिपस गंडाचा काळ :→ ३ ते ५ वर्ष फ्राईडच्या मते, या अवस्थेत मुलाल आईच्या प्रेमात कोणीही नको असे सतत वाटते आपल्या प्रमाणेच आपल्या वडिलांचा देखील आईवर अधिकार आहे याची जाणीव मुलाला होते. त्यामुळे मुल वडिलांचा द्वेष करु लागते यालाच "ईडिपस गंड" असे म्हणतात द्वेषाच्या आणि रागाच्या भावनेचा उगम या अवस्थेत होतो. या अवस्थेत देखील आईची भूमिका महत्वाची असते. आईप्रमाणेच कुटुंबातील इतर सदस्य देखील मुलाल वळण लावण्याच्या कार्यात सहभागी होतात.

[ब] लॅटेन्सीचा काळ :→ ५ ते १२ वर्ष या काळात

मूल शाळेत जाऊ लागते. शिक्षक आणि मित्रांशी आंतरक्रि घडून येतात. त्याचा प्रभाव मुलांवर होऊन त्यांचा शारीरि मानसिक आणि बौद्धिक विकास साधला जातो. या अवस्थेत लिंगानुरूप स्वतःच्या भूमिकाचा परिचय होतो मुलगा वडिलप्रमाणे आणि मुलगी आईप्रमाणे भूमिका करण्याचा प्रयत्न करते. आकांक्षाची सुरुवात याच अवस्थेत होते. सहकार्य, स्पर्धा, संघर्ष या प्रक्रियांचा परिचय सहजीवनातूनच होतो. शाळेतील विविध स्पर्धां सहभागी होऊन व्यक्तिमत्वाचा विकास करण्याची संधी मुलाल मिळते.

8) पौगंडावस्था [Adolescent Stage] :→ मुलाच्या वयाच 14 ते 18 वर्षाचा समावेश या अवस्थेत होतो. युवावस्थेच सुरुवात याच काळात होते. त्याच्यात शारीरिक बदल होते. 'स्व' चा विकास साधून 'मी' पणाची जाणीव होते. मुलगा स्वतःचा निर्णय घेतो. स्वतःच्या मताप्रमाणे वागले पाहिजे अशी स्वातंत्र्याची भावना निर्माण होते. आत्मकेंद्री प्रवृत्ती निर्माण होते. मुलप्रती समाजाच्या का अपेक्षा उंचावलेल्या असतात. त्या पूर्ण करण्याकरीता तो प्रयत्नशील असतो आणि स्वतःच्या व्यक्तीमत्वाचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला जातो. इतरांची सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न केला जातो.

* या अवस्थेत मुलाला योग्य मार्गदर्शनाची गरज असते अन्यथा विचलित वर्तनाकडे तो आकर्षित होऊ शकतो

व्यक्तिमत्वाचा जडण - घडणीत आई - वडिलांचा आदर्श शिक्षकांचा आदर्श महत्वाच्या असतो. पौगंडावस्थेत मानसिक स्थिती ही स्थिर नसते म्हणून समाजाकडून त्याला योग्य मार्गदर्शनाची आवश्यकता असते. या अवस्थेनंतर "स्व" ची निर्मिती होते.

## सामाजीकरणाची माध्यमे किंवा साधने.

[Agencies of Socialization]

* सामाजीकरण हे आपोआप घडून येत नाही समाजातील काही माध्यमाद्वारे सामाजीकरणाची प्रक्रिया घडून येते. सामाजिकरण हे आंतरक्रियेतून संपन्न होत असते. ह्या आंतरक्रियेत (अ) वडिलधाऱ्या अधिकारी व्यक्ति (ब) समवयस्क व्यक्ति यांचा अंतर्भाव होतो.

* वडिलधाऱ्या व्यक्तिमध्ये आई - वडील, मोठी भावंडे, नातेवाईक, शिक्षक, अधिकारी इत्यादींचा समावेश होतो. वडिलधाऱ्या व्यक्ति मुलाने समाजमान्य आचार - विचारांचे पालन करावे तसेच त्या आचार - विचारांचे अंतरीकरण केले जावे याकडे देखील लक्ष देतात. मुलाकडून मिळणाऱ्या वारसांचे संक्रमण करणारी वडिलधारी मंडळी आधारस्तंभ असतात. समवयस्क व्यक्तिमध्ये मित्र, भाऊ - बहीण, क्रिडा गटातील सदस्य यांचा समावेश होतो. सामाजीकरणाची प्रमुख माध्यमे पुढीलप्रमाणे आहेत.

1) कुटुंब :→ सामाजीकरणाच्या प्रक्रियेमध्ये कुटुंबाचे महत्व अनन्यसाधारण आणि मौलिक आहे. कुटुंब या प्राथमिक समूहाद्वारे व्यक्तीचे सामाजिकरण घडून येते. व्यक्तिमत्वाची सर्वसाधारण भूमिका तयार करण्याचे कार्य कुटुंब संस्था करीत असते. आई - वडील यांच्या सहवासात राहुन मुलाला समाजातील प्रमाणके व मूल्ये, परंपरा, नैतिकता, धर्म यांचा परिचय होतो. कुटुंबातील सदस्यांचे संबंध हे सहकार्यात्मक, स्वयंस्फूर्त, नैसर्गिक असे असतात.

एकत्वाच्या भावनेची जाणीव सर्वात प्रथम कुटुंबाद्वारे होते. संघर्षातून मार्ग कसे काढावे याचे धडे व्यक्तिला कुटुंबातूनच सर्वप्रथम मिळतात.

* मुलाच्या अनेक गरजा असतात शारीरिक आणि मानसिक गरजांची पूर्तता कुटुंबाद्वारेच होते. या गरजांची पूर्तता करण्याची जबाबदारी ही आई - वडिलांची असते. सर्व प्रकारचे संरक्षण देऊन मुलाच्या व्यक्तिमत्वाची वाढ आई योग्य प्रकारे करीत असते. मुलाच्या सर्व प्रकारच्या गरजा वडिल पूर्ण करतात. तसेच आपल्या मुलांना योग्य ते मार्गदर्शन करतात. आई-वडिल हे अधिकारी व्यक्ति आणि आदर्श व्यक्ति या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण अशा भूमिका पार पाडतात.

* कुटुंबात दोन प्रकारचे सामाजिक संबंध अनुभवास येतात (अ) आई - वडील मुलापेक्षा मोठे असतात. (ब) मुलगा आणि भावंडे यांच्यातील संबंध हे बरोबरीचे असतात. आई - वडील मुलांना वळण लावतांना त्याला अनेक गोष्टी अधिकाराने शिकवितात भावंडे एकमेकांसोबत मोकळेपणाने वागत असतात. या संबंधातून ते अनेक गोष्टी आत्मसात करतो. सहकार्य, स्पर्धा, संघर्ष, तडजोड करणे, या गोष्टी सर्वप्रथम तो आपल्या भावंडातून शिकत असतो.

2) <u>शेजार</u> :-> कुटुंबानंतर मुलाचा संबंध शेजार या

समूह किंवा सवंगडी येतो. शेजार समूहाचा प्रभाव मुलाच्या व्यक्तिमत्वावर होतो. मुल शेजाऱ्यांचे अनुकरण करतो. उत्तम किंवा चांगल्या शेजाऱ्यांच्या परिणाम हा चांगले व्यक्तिमत्व तयार होण्यामध्ये होतो. सर्व प्रकारच्या वर्तन प्रतिमानांची ओळख मुलाला शेजार समूहाकडून हो

* शेजाऱ्यांच्या सहवासातून सहकार्याची भावना अधिक दृढ होण्यास ~~मदस~~ मदत होते. सहिष्णुता, तडजोड या सद्गुणांची वाढ शेजाऱ्यांच्या संपर्कातून होते. वाईट शेजाऱ्यांच्या प्रभावामुळे मुलांचे सामाजीकरण दोषपूर्ण होते. म्हणून चांगल्या शेजार हे माध्यम सामाजीकरणाच्या प्रक्रियेत महत्वपूर्ण आहे.

3) शाळा :-> शाळा हा दुय्यम समूह होय सामाजिकरणात या गटाचे देखील विशेष महत्व आहे. या समूहात मुलाच्या सामाजिक वर्तुळाची सीमा अधिक मोठी होते. शिक्षक - विद्यार्थी यांच्या समोर सामाजिक आंतरक्रिया घडून मुलगा अनेक गोष्टी आत्मसात करते.

* औपचारिक आणि अनौपचारिक अशा दोन्ही स्वरूपाचे शिक्षण - शाळेद्वारे मुलाला प्राप्त होते. आणि त्याचा ज्ञानाची पातळी वाढते. शिक्षक हे अधिकारी असतात आणि मुलाच्या चारित्य संवर्धनाची जबाबदारी संपूर्ण त्यांच्यावर असते. आदर्श शिक्षकांच्या प्रभावामुळे मुलाचे एक आदर्श व्यक्तिमत्व तयार होत असते. आई-वडि

सांगितलेली गोष्ट तो एकत नाही. पण तीच गोष्ट शाळेत शिक्षकांनी सांगितली तर त्यानुसार तो वर्तन करतो.

* शिस्तबद्ध वर्तनाचे धडे शाळेकडूनच मुलाला मिळतात. शिक्षकांचा आदर करणे आणि इतर नियमांचे काटेकोर - पणे पालन करून मुले स्वतःचे वर्तन भावी जीवनासाठी तयार करतात. वर्ग मित्रांसोबत राहिल्यामुळे अनेक सद्गुणांची वाढ होते. परस्परांविषयी प्रेम, जिव्हाळा, आत्मियता याशिवाय सहकार्य, तडजोड करणे, तसेच राष्ट्रीय एकात्मतेची बीजे शाळेतच सर्वप्रथम रोवली जातात. म्हणून सामाजीकरणाच्या प्रक्रियेत शाळा या समुहाला विशेष महत्व आहे. शाळेनंतर महाविद्यालय आणि इतर संघटनामार्फत सामाजिकरण होते.

4) <u>समवयस्कांचा समूह</u> :→ व्यक्तिचे सामाजीकरण करण्यामध्ये समवयस्कांचा समूह महत्वाचे कार्य करतो. बालयावस्थेत मुलगा बरोबरीच्या मुलांशी खेळतो आणि समवयस्कांचा समूह तयार होतो. समवय - स्कांच्या समुहाकडून मुलांवर सामाजिक नियंत्रण प्रस्थापित केले जाते.

* खेळ खेळताना खेळाचे नियम पाळायचे मुले शिकतात. सामाजिक प्रथा, परंपरा, नियम, कायदा याचे महत्व या गटाद्वारे मुलांना कळते. स्पर्धा, संघर्ष, सहकार्य

तडजोड इत्यादी गोष्टींची जाणीव मुलांमध्ये या समूहाद्वारे होते. नेतृत्वाच्या गुणांचा विकास समवयस्कांच्या समुहा[illegible] होत असते.

* बाल्यावस्थेतील समवयस्कांच्या समुहानंतर पौगंडावस्थेत समवयस्क मुलांचा समूह तयार होतो. मुलांना सामाजिक दर्जा, प्रमाणके व मूल्ये यांची जाणीव या गटाद्वारे होते मुलाला सामाजिक जीवन जगण्यासाठी सर्व गुणांची वाढ या समूहाद्वारे होते. एक दुसऱ्यांच्या सुख - दुःखात सहभा[illegible] होणे, सहकार्य करणे आणि स्वतःच्या जीवनाला योग्य दिशा मिळणे या सर्व बाबी मुलांच्या व्यक्तिमत्वाच्या वाढीसाठी आवश्यक असतात. तसेच सामाजिक जीवनास महत्वाच्या ठरतात. आधुनिक काळात समवयस्कांच्या गटाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे. कारण समाजाचे सातत्य या समूहावर अवलंबून असते.

SHAKTI

DATE: / /

## सामाजीकरणाचे महत्व.
## (Importance of Socialization)

* व्यक्ति आणि समाज या दोघांच्या दृष्टीने सामाजीकरणाचे विशेष महत्व आहे. जनमतः मन हे कोऱ्या पाटीप्रमाणे. हळूहळू त्याच्यावर सामाजीकरणाद्वारे अनेक संस्कार केले जातात. कुटुंब या प्राथमिक समूहाद्वारे मुलावर संस्कार केले जातात. शिस्तीचे पालन करणे, स्वतःच्या वर्तनात कुटुंबातील सदस्यांकडून मिळालेल्या सूचना आणि संकेताद्वारे बदल करणे इत्यादी गोष्टी मूल शिकत असते. सामाजीकरणाद्वारे समाजाची संस्कृती आत्मसात करण्याची त्याला संधी मिळते. इतकेच नव्हे तर व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाचा विकास हा सामाजीकरणामुळेच होत असतो. त्यामुळे व्यक्तिला आपल्या 'स्व' ची जाणीव होते आणि स्वतःमध्ये असलेल्या सुप्त गुणांची वाढ करून वैयक्तिक विकास साधल्या जातो.

* चांगल्या - वाईट, योग्य - अयोग्य अशा वर्तनाचे मूल्यांकन करून व्यक्ती 'स्व' चा विकास साधण्याचा प्रयत्न करीत असते. भावी जीवनात कोणत्या भूमिका कराव्या लागणार आहे याचा विचार करून त्या दृष्टीने व्यक्ति प्रयत्नशील असते.

उदा :- लहान मुलाला विचारले की तू मोठेपणी कोण होणार ? तर तो लगेच उत्तर देतो, 'मला

बाबासारखे डॉक्टर व्हायचे !' किंवा 'मी प्राध्याप
होणार !' अशा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी त्याने
समाजाकडून काय शिकायचे आहे याची जाणीव
सामाजीकरणातूनच होत असते. अशाप्रकारे 'स्व'
विषयक जाणिवेचा विकास सामाजीकरणातून होत अ
यावरून स्पष्ट होते की, व्यक्तीच्या दृष्टीकोनातून
सामाजीकरणाचे विशेष महत्व आहे.

* व्यक्तिप्रमाणेच समाजाकरीता देखील सामाजीकरणाचे
महत्व आहे. विशेष म्हणजे पिढ्यानपिढ्या समाजाचे
सातत्य सामाजिकरणामुळेच टिकले आहे. सामाजीक
द्वारेच समाजाची संस्कृति टिकुन राहिली आहे.
समाजाची विचारसरणी आणि जीवनमूल्ये व्यक्ति
स्विकारते आणि त्यानुसार वर्तन करते. सामाजीकर
च्या प्रक्रियेतून व्यक्ति कर्तव्याची जाणीव, सहिष्णुत
सहकार्य, आत्मीयता, एकात्मता हे गुण शिकत असते
या सर्व गोष्टीमुळे समाजाचे सातत्य टिकून आहे.

* अर्थपूर्ण जीवन जगण्यासाठी आवश्यक असलेल्या
सर्व गुणांची वाढ सामाजीक आंतरक्रियामधून हो
समाजाचा एक क्रियाशील सदस्य होण्याकरीता
व्यक्तीचे सामाजीकरण होणे अतिशय महत्वाचे आहे.
यावरून हे स्पष्ट होते की, व्यक्ति आणि समाज
यांचे अस्तित्व सामाजीकरणावर अवलंबून आहे.
म्हणून व्यक्ति आणि समाजाच्या दृष्टीने सामाजीक

याचे अनन्यसाधारण महत्व आहे.

Principal
Yashoda Girls Arts & Commerce
College, Sneh Nagar, Nagpur-15

SEAL